Reg. No. 829 Ahmednagar
Date: 2/3/2006

# Hon. Shri. Babanrao Pachpute Vichardhara Trust

A/P: Kashti, Tal.- Shrigonda, Dist.- Ahilyanagar 414 701.

HSBPVT/2025-26/1786 Date:-02/06/2025

सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दि. ०१/०६/२०२५ पासून खालील प्रमाणे रजा लागू राहतील.

**अ) शिक्षकांना देय असलेल्या रजेचे प्रकार :-**

१) किरकोळ रजा - ०८
२) आजारी रजा - ०८
३) ड्युटी लीव्ह (OD) - ०८

Hon. Shri Babanrao Pachpute Vichardhara Trust Kashti, Tal. Shrigonda Dist. A. Nagar — Reg No. 829/A.Nagar Dt. 2/3/06

**ब) शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रजेचे प्रकार :-**

१) किरकोळ रजा - ०८
२) आजारी रजा - ०८
३) अर्जित रजा - ०८

**१) रजा हि हक्क म्हणून मागता येणार नाही.**
**२) अपवादात्मक स्थिती सोडून रजा हि पूर्व परवानगीनेच घेणे बंधनकारक राहील.**
**३) त्याच प्रमाणे अपवादात्मक स्थिती सोडून कोणत्याही प्रकारे ग्रुप वर सुट्टीचा मेसेज टाकू नये तो ग्राह्य धरला जाणार नाही.**

## किरकोळ रजा :-

१) प्रत्येक कर्मचाऱ्याला १ जून ते ३१ मे एकूण ०८ किरकोळ रजा देय राहतील.
२) किरकोळ रजा हि महिन्याच्या प्रमाणे समप्रमाणात घेता येईल.
३) किरकोळ रजा हि पूर्व मंजुरी घेऊनच उपभोगता येईल.
४) अर्धा दिवसाची रजा मंजूर केली जाणार नाही.
५) किरकोळ रजा हि पुढील वर्षात धरली जाणार नाही.
६) रजेवर जाताना आपल्या कामाची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे.
७) तीन वेळा उशीरा आलेल्या कर्मचाऱ्याची एक रजा खर्ची टाकण्यात येईल, रजा शिल्लक नसल्यास बिनपगारी करण्यात येईल.

## आजारी रजा :-

१) प्रत्येक कर्मचाऱ्याला १ जून ते ३१ मे या एका वर्षाच्या कालावधी मध्ये एकूण ०८ पूर्ण दिवस आजारी रजा देय राहतील.

२) आजारी रजेनंतर कामावर रुजू होताना रजिस्टर्ड मेडिकल प्रक्टिकशनर चे मेडिकल सर्टिफिकेट / फिटनेस सर्टिफिकेट जमा करणे आवशक आहे.

३) आजारी रजा पुढील वर्षात कॅरी फॉरवर्ड (पुढे नेल्या जातील), केल्या जातील व रिटायरमेंट नंतर अथवा नोकरी सोडल्यानंतर सदर साठवलेल्या रजेचे encashment of leave (रजेचे रोखीकरण) करता येईल.

४. जे कर्मचारी Spot Resignation (नोटीस कालावधी पूर्ण न करता) देतील त्यांना सदर रजेचे encashment of leave (रजेचे रोखीकरण) करता येणार नाही.

**अर्जित रजा :-**

१) शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याला १ जुन ते ३१ मे या एका वर्षाच्या कालावधी मध्ये एकूण ०८ दिवस अर्जित रजा देय राहतील सदर रजेसाठी पूर्व परवानगी आवश्यक आहे.

२) अर्जित रजा दोन सुट्यांच्या मध्ये घेता येणार नाही, घेतल्यास सुट्टीचा दिवस हि अर्जित रजा म्हणून खर्ची टाकण्यात येईल.

३) अर्जित रजा पुढील वर्षात कॅरी फॉरवर्ड (पुढे नेल्या जातील), केल्या जातील व रिटायरमेंट नंतर अथवा नोकरी सोडल्यानंतर सदर साठवलेल्या रजेचे encashment of leave (रजेचे रोखीकरण) करता येईल.

४) जे कर्मचारी Spot Resignation (नोटीस कालावधी पूर्ण न करता) देतील त्यांना सदर रजेचे encashment of leave (रजेचे रोखीकरण) करता येणार नाही.

**बदली रजा :-**

१) शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी सुट्टीच्या दिवशी कामावर हजर असल्यास व सदर दिवसासाठी कुठलेही **मानधन अथवा टीए/ डीए घेतला नसल्यास** पर्यायी सुट्टीचा लाभ घेता येईल. पर्यायी रजा मंजुरीसाठी **मा. प्राचार्य व मा. अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी** घेणे आवश्यक आहे.

२) सुट्टीच्या दिवशी कामावर हजर रहावयाचे असल्यास **मा. प्राचार्य व मा. अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांची लेखी पूर्व परवानगी** घेणे आवश्यक आहे. सदर परवानगी अर्जामध्ये कामाचे स्वरूप नमूद करणे आवश्यक आहे. त्यानंतरच बदली रजा संबंधीत कर्मचाऱ्याच्या नावावरती जमा करण्यात येईल.

३) सदर रजा हि पुढील दोन महिन्यातच घेणे आवशक आहे.

४) सदर रजा पुढील वर्षात धरली जाणार नाही.

• शिक्षक कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाच्या सोयीनुसार आळीपाळीने उन्हाळी सुट्टी देण्यात येईल त्यासाठी संबंधित प्राचार्यांनी उन्हाळी सुट्टीच्या कार्यालयीन आदेशावर **मा. अतिरिक्त कार्यकारी अधिकारी यांची लेखी पूर्व परवानगी** घेणे आवश्यक आहे.

• शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २४ व शिक्षक कर्मचाऱ्यांना २४ रजा वरीलप्रमाणे १ जुन ते ३१ मे दरम्यान दिल्या जातील. रजेची कमाल मर्यादा २४ च असेल आपण सदरच्या रजा आपल्या गरजेप्रमाणे व आवश्यकतेनुसार उपभोगू शकता.

Chief Executive Officer
Hon.Shri.Babanrao Pachpute
Vichardhara Trust